**औरंगाबाद महानगरपालिकेतील पदांच्या**
**<u>आकृतीबंधाबाबत</u>.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांक:-** औमपा-२०१५/प्र.क्र.२१०/(भाग-१)/नवि-२४
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला, राजगुरू हुतात्मा चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
**दिनांक:- १६ एप्रिल, २०२१**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय, समक्रमांक दि. १५.२.२०२१.
२)आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांचे पत्र क्र.मनपा/आस्था-१/२०२१/४६०, दि.१९.३.२०२१.

**शुद्धीपत्रक:-**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापनेवर नवीन पदनिर्मितीसह आकृतीबंधास संदर्भीय शासन निर्णय दि.१५.२.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर आकृतीबंधात सुधारणा/दुरुस्ती करणे आवश्यक असून, त्याबाबत शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेण्याची आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी संदर्भीय दि.१९.३.२०२१ च्या पत्राद्वारे विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने संदर्भीय शासन निर्णय दि.१५.२.२०२१ मध्ये खालील प्रमाणे सुधारणा/दुरुस्ती करण्यात येत आहेत:-

१) शासन निर्णयातील प्रपत्र-अ मधील मुख्य स्वच्छता अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे – रु.४६०० अशी वाचण्यात यावी.

२) शासन निर्णयातील प्रपत्र- इ मधील परिमंडळ कार्यालय १ व २ मधील लेखा अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४४०० अशी वाचण्यात यावी.

३) शासन निर्णयातील प्रपत्र-इ मधील घनकचरा व्यवस्थापन विभागामधील स्वच्छता निरीक्षक या पदाची वेतनश्रेणी रु.५२००-२०२००, ग्रेड पे रु.२८०० अशी वाचण्यात यावी.

४) शासन निर्णयातील प्रपत्र-ड नुसार व्यपगत करण्यात आलेल्या समुह संघटक या पदाची वेतनश्रेणी रु.५२००-२०२००, ग्रेड पे रु.२८०० अशी वाचण्यात यावी.

५) आकृतीबंधातील प्रपत्र-इ मधील मालमत्ता व्यवस्थापन विभागातील अनुरेखक (ट्रेसर) व घनकचरा व्यवस्थापन विभागातील लेखा लिपीक ही पदे वगळण्यात येत आहेत.

६) सदर आकृतीबंधातील प्रपत्र-अ मधील तारतंत्री (वायरमन) या पदनामा ऐवजी विद्युत लाईनमन (तारमार्ग तंत्री विद्युत) असे पदनाम वाचण्यात यावे.

७) औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधातील पदांनुसार महानगरपालिकेतील आवश्यक कामांचे वाटप तसेच विभागांची निर्मिती आयुक्त तथा प्रशासक, औरंगाबाद महानगरपालिका यांनी अंतर्गत व्यवस्थेने त्यांचे स्तरावर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आवक पत्र क्र. 107
आस्था-१ विभाग..............
दिनांक 16/4/2021 वेळ.......
लिपीकाचे नांव ..................

( प्रदीप पाटील )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) **मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.**
२) **मा. मंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.**

Scanned with CamScanner